## : **निशाणी क्र. ०५ च्या अर्जावर आदेश** :

१. सदरचा अर्ज 'तातपुरत्या—मनाई'चा आहे. वादीचे थोडक्यात कथन असे की, होकर्णा गावातील शेतजमीन गट क्र. ५३ क्षेत्र ३ हे. ४८ आर त्याच्या मालकीची असून, त्या जमीनीच्या दक्षिणेला प्रतिवादींच्या जमीनी आहेत. ता. २५.०१.२०१३ ला सकाळी दहाच्या सुमारास, वादी दावा मिळकतीत गव्हाच्या पिकाची पेरणी करीत असतांना, प्रतिवादींनी त्यास अडथळा केला. म्हणून त्यांच्या विरूध्द मुख्य दावा केला आहे. तथापि, त्याचा गुण—दोषांवर निकाल लागण्यास वेळ लागेल. तरी, तो पर्यंत दावा मिळकतीतील वादीच्या कब्जास प्रतिवादींनी कसल्याही प्रकारे अडथळा करू नये अशी त्यांना 'तुर्तातूर्त—ताकीद' द्यावी यासाठी हा अर्ज आहे.

२. या अर्जास प्रतिवादी क्र. १ याने आपले लेखी म्हणणे नि.क्र. ४७ ला दिले आहे. त्यात त्याचे कथन असे की, ज्या अर्थी ता. २९.०१.२०१३ ला वादीने हा दावा दाखल केला आहे. त्या अर्थी, त्या दिवशी अथवा त्या पूर्वी वादीच्या ताब्यास कोणीही कसलाही अडथळा केलेला नाही. त्याचे पुढे कथन असे की, मी आणि वादी यांच्या जमीनीमध्ये एक मोठा नाला तसेच बांध असून त्या बांधावर मोठ—मोठे वृक्ष आहेत. अशा परिस्थितीत, वादी अथवा प्रतिवादी यापैकी कोणीही हद्दीचे नुकसान करू शकत नाही. थोडक्यात, या अर्जास कसलेही कारण घडलेले नाही. तरी, हा अर्ज फेटाळावा.

३. प्रतिवादी क्र. २ व ४ यांनी या अर्जास दिलेले लेखी म्हणणे नि.क्र. ५७ ला आहे. त्यांचे कथन असे की, दावा मिळकत वादीच्या मालकीचीही नाही आणि ती त्याच्या ताब्यात देखील नाही. ता. २४.०५.२००७ च्या मोजणीनुसार दावा मिळकतीतील १३ आर क्षेत्र आमच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. त्या जमीनीत ५० वर्षापेक्षा अधिक काळ आमचाच ताबा असल्याने तेवढया क्षेत्राचे आम्ही 'विरूध्द—कब्जा'ने मालक

झालो आहोत. त्यांचे शेवटी कथन असे की, वादी आणि आमच्या जमीनीमध्ये एक नाला असून, त्या नाल्याच्या पलीकडील क्षेत्रात वादीला कसलाही हक्क नाही. तरी हा अर्ज फेटाळावा.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. तसेच वादीतर्फे नि.क्र.८८ ला सादर केलेला लेखी युक्तीवाद देखील बारकाईने वाचला.

५. खालील मुद्दे माझे विचाराधीन असून, त्यावर माझे निर्णय कारणांसहित असे आहेत :–

| | **मुद्दे** | **निर्णय** |
|---|---|---|
| ५–अ. | वादीला सकृतदर्शनी केस आहे का ? | ...होय. |
| ५–ब. | अनुकूलतेचा कल वादीच्या बाजूने आहे का ? | ...होय. |
| ५–क. | जर, हा अर्ज फेटाळला तर, वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे का ? | ...होय. |
| ५–ड. | आदेश काय ? | ..सदरचा अर्ज मंजूर केला आहे. |

## : का र णे :

६. मुद्दा क्र. ५–अ असा आहे की, वादीला सकृतदर्शनी केस आहे का ? यावर विचार करता, प्रतिवादी क्र. १ याने आपल्या लेखी म्हणण्यात दावा मिळकतीतील वादीची मालकी आणि कब्जा अजिबात नाकारलेला नाही. तसेच, सन २०११–१२ चा नि.क्र. ८ चा ७/१२ उतारा असे दर्शवितो की, गट क्र. ५३ या शेतजमीनीचे क्षेत्र ३ हे. ४८ आर असून, तिचा 'भोगवटादार' वादी नागोराव शेकापूरे हाच आहे. सबब, या मुद्दयावर माझा निर्णय होकारात्मक आहे.

७. मुद्दा क्र.५–ब असा आहे की, अनुकूलतेचा कल वादीच्या बाजूने आहे

का ? यावर विचार करता, ता. २४.०५.२००७ चा 'मोजणी–नकाशा' पाहिला. त्यातील लाल रंगाने दर्शविलेले त्रिकोणी आकाराचे क्षेत्र ०.१३ आर आहे. प्रतिवादी क्र. २ व ४ यांच्या कथनानुसार, 'गेल्या ५० वर्षापासून ते क्षेत्र आमच्याच प्रत्यक्ष ताब्यात आहे. त्यामूळे, आम्हीच त्या क्षेत्राचे विरूध्द कब्जाने मालक झालो आहोत'. तथापि, ५० वर्ष या प्रदीर्घ काळ सदरचा भूभाग प्रतिवादींच्याच प्रत्यक्ष कब्जात आहे हे त्यांना पुराव्याने शाबीत करावे लागेल. मोजणीचा नकाशा ज्याने बनविला त्याची साक्ष झाल्याखेरिज आणि तो उलटतपासाला सामोरा गेल्याखेरीज, त्या नकाशात दर्शविलेली परिस्थिती वस्तूस्थितीनुसार आहे असे आपोआप गृहीत धरता येणार नाही. सबब, या मुद्दयावर माझा निर्णय वादीच्या बाजूने आहे.

८. मुद्दा क्र.५–क असा आहे की, जर, हा अर्ज फेटाळला तर, वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे का ? यावर विचार करता, जरी प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीतील वादीचा हक्क नाकारला नसला तरी, प्रतिवादी क्र. २ व ४ हे दोघेजण तो नुसताच नाकारत नाहीत तर, वादीच्या जमीनीवरील १३ आर क्षेत्रफळावर विरूध्द कब्जाने मालकीहक्क दाखवू लागले आहेत. हे विचारात घेता, जर हा अर्ज फेटाळला तर, त्यामुळे वादीचे भविष्यात पैश्याने कधीही न भरून निघणारे नुकसान होणार आहे. हे स्पष्ट होते. तरी, या मुद्दयावर माझा निर्णय होकारात्मक आहे.

९. मुद्दा क्र.५–ड असा आहे की, आदेश काय ? यावर विचार करता, वादी आणि प्रतिवादी यांच्या जमीनींच्यामध्ये एक नाला वाहतो आहे असे प्रतिवादींचे कथन आहे. त्यामूळे, तो नाला ओलांडून एकमेकांच्या हद्दीत अडथळा करण्याची सुतराम शक्यता नाही असा त्यांचा बचाव आहे. तथापि, ता. २४.०५.२००७ च्या मोजणी नकाशात कोणत्याही दिशेला नाला दाखविलेला नाही. त्यामूळे, नाल्याच्या अस्तित्वामूळे वादीच्या जमीनीस आपोआप 'नैसर्गीक–संरक्षण' मिळाले आहे असे म्हणता येणार नाही. तरी, या मुद्दयावर माझा निर्णय असा आहे की, सदरचा अर्ज मंजूर केला आहे.

१०. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करून खालील आदेश करीत आहे.

: **आ दे श** :

१. सदरचा अर्ज मंजूर केला आहे.

२. दिवाणी मुकदमा क्र. ८०/२०१३ चा अंतिम निकाल होईपर्यंत, प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी दावा मिळकत होकर्णा येथील शेतजमीन गट क्र.५३ क्षेत्रफळ ३ हे. ४८ आर मध्ये वादीच्या कब्जास कसल्याही प्रकारे अडथळा करू नये अशी त्यांना 'तुर्तातुर्त–ताकीद' दिली आहे.

३. या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. २ आणि ४ यांनी वादीला द्यावा.

**( श्री. व्यं. पोतदार )**
सह–दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
अहमदपूर.

तारीख २२/०४/२०१५.